**International Research Journal of Humanities, Language and Literature**

**ISSN: (2394-1642)**

**Impact Factor 5.401 Volume 7, Issue 7, July 2020**

**Association of Academic Researchers and Faculties (AARF)**

**Website-www.aarf.asia, Email : editor@aarf.asia , editoraarf@gmail.com**

# मृत्युंजय कादंबरीमधील कर्ण

**डॉ. भारती खापेकर**

सहयोगी प्राद्यापक व

मराठी विभाग प्रमुख,

धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

**प्रास्ताविक**

महाभारतातील कर्ण या व्यक्तिरेखे बद्दल भारतीय लेखकांना आकर्षण वाटते आहे. कर्ण उदार, शूर, दानवीर म्हणून प्रसिध्द आहे. आपण कोण आहोत? कुठल्या कुळातले आहेत? आपले आई वडील कोण आहेत? याचा तो शोध घेतो. आपल्यालाच कवचकुंडले आहे, इतरांना का नाहीत? हाही एक प्रश्न कर्णाच्या व्यक्तिरेखेतून शिवाजी सावंत यांनी रंगविलेला आहे. ही कादंबरी रंगवितांना अनेक अलंकारिक शब्दाचा वापर लेखकाने केला आहे. या कादंबरीत कर्ण स्वत:च्या जीवनाची भावकहाणी सांगतो. तसेच या कादंबरीत कर्ण, कुंती, वृशाली, दुर्योधन, शोण, कृष्ण यांची निवेदने आली आहेत. या निवेदनातून कर्णाचा दानशूरपणा आणि श्रेष्ठत्व साकार झाले आहे. मृत्युंजय ही कादंबरी शिवाजी सावंत यांच्या लेखन कर्तृत्वाचे शिखर आहे. ही कादंबरी अतिशय लोकप्रिय झाली आणि कादंबरीला भारतीय ज्ञानपीठाचा १९९६ चा मूर्तिदेवी पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**कथानक**

या कादंबरीत कर्ण स्वत:च्या जीवनाचे वर्णन करतो. कर्णाचे जीवन म्हणजे परिस्थितीच्या काटेरी कुंपणावरील एक तलम वस्त्र आहे ते नियतीच्या काटेरी कुंपणात अडकून त्याच्या चिंध्या झाल्या, कर्णाचे जीवन झंझावातासारखे आहे. चंपानगरीत कर्णाच्या जीवनसरितेला वळण लागले असे लेखकाला वाटते म्हणून या कादंबरीत कर्णाच्या बालपणाचे आणि चंपानगरीचे वर्णन आले आहे. चंपानगरीत कर्णाचे बालपण गेले हे बालपण कर्णाला अनिर्बंध रथासारखे वाटते. कर्णाला दोन भाऊ होते. एक शोण दुसरा वृकरथ हा बालपणापासून मावशीकडे राहतो. कर्ण हा राधा व अधिरथावर प्रेम करतो, तसेच भाऊ शोण याच्यावरही त्याचे प्रेम असते. आपल्याला कवचकुंडल आहे इतरांना नाहीत असा प्रश्न त्याला पडतो. तो या विषयी आई बाबा आणि शोणाला विचारतो तेंव्हा त्याचे बाबा म्हणतात "गंगा माताच तुला त्याच कधीतरी उत्तर देईल."[१] एक दिवस त्याच उत्तर विचारायला तो गंगामातेकडे जातो पाण्यात पोहतो, त्याला पाण्यामध्ये आपली कुंडले चमकताना दिसतात पुन्हा तो विचार करतो "पण चमकणारी कुंडले मला एकट्यालाच का मिळाली होती? पण कोण आहे मी?"[२] अशाप्रकारे कर्ण स्वत:चा शोध घेतो.

एक दिवस कर्ण आणि त्याचा भाऊ खेळत असतो. शोणाला जखम होते रक्त येते तेंव्हा कर्ण अंगाला बाण टोचतो बाण त्याला लागत नाही तेंव्हा त्याच्या मनात विचार येतो "माझ्या शरीराच कातड अभेद्य आहे की काय?"[३] कधी त्याला वाटते रथातून उडी घ्यावी, कधी वाटते आपण अमर राहणार का? तर कधी विचार कारतो "शोण माझा सख्खा भाऊ आहे तरीही त्याला मात्र कवच आणि कुंडल यापैकी काहीच नाही मला एकट्याला ती का मिळालीत मी कोण आहे? कोण आहे मी?"[४] अशाप्रकारे लेखकाने स्वचा शोध घेणारे कर्णाचे मन दाखविले आहे.

एक दिवस कर्णाचे अधिरथबाबा त्याला हस्तिनापुरला नेतात. अधिरथाची अशी इच्छा असते की, कर्णाला द्रोणचार्याकडे घेऊन जावे आणि विद्याशिकवावी तो क्षत्रिय नसल्यामुळे द्रोणाचार्य त्याला विद्या द्यायला नकार

**© Association of Academic Researchers and Faculties (AARF)**

A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

देतात. कृपाचार्याच्या पथकात दाखल व्हायला सांगतात. हस्तिनापुरात दुर्योधन आणि भी म कर्णाची चौकशी करतात कर्ण त्यांना अधिरथाचा पुत्र असल्याचे सांगतो. जेव्हा कर्ण गुरूदेवाच्या आश्रमात जातो तेव्हा तेथे अर्जुन येतो अर्जुन आल्यामुळे कर्णाला गुरूचा आशिर्वाद मिळत नाही. संजय कर्णाला आणि त्याच्या कार्याविशयी माहिती देतात. कर्ण सूर्याची उपासना करून पक्षाचे डोळे फोडतो गुरू कृपाचार्याच्या पथकात कर्ण असतो पण त्याची कोणी विचारपुस करीत नाही. कर्णाचे आणि एकलव्याचे दु:ख एकच असते. दोघांनाही विद्या द्यायला द्रोणाचार्य नाकारतात. आपल्या गुरूने आपले कौतुक करावे असे कर्णाला वाटते.

गुरू द्रोणाचार्य राजपुत्राची परीक्षा घेतात, तेंव्हा कर्णालाही पराक्रम करावा असे वाटते कर्णाने पराक्रम करूनही सूतपुत्र असल्यामुळे द्रोणाचार्य व कृपाचार्य त्याचा अपमान करतात. दुर्योधनाला कर्णाचा अपमान सहन न झाल्यामुळे तो कर्णाला अंगदेशाचा राजा करतो व एका पराक्रमी वीराला मित्र बनवतो.

या कदंबरीतली कुंती ही मनोगत व्यक्त करते. पृथा ही मथुरेच्या शुरसेन राजाची कन्या तिला तिचे वडील कुंतीभोजाला दत्तक देतात. कुंतीभोजाच्या राजवाड्यात एक दिवस दुर्वास ऋषी येतात. कुंती त्यांची सेवा करते. कुंतीच्या सेवेमुळे प्रसन्न झालेले दुर्वास ऋषी तिलामंत्र देतात आणि निघून जातात. यानंतर कुंती मंत्राचा उपयोग करून सूर्यदेवाला आवाहन करते. सूर्यदेव येतात सूर्यापासून तिला पुत्र होतो. तिच्या सेवेत एक दासी असते ती त्या पुत्राला पेटीत ठेवते आणि अश्विन नदीच्या पाण्यात सोडते पण ती आणत नाही. दुसरी दासी विष आणू देते. कुंती विष प्राशन करते तरी मरत नाही तिच्या मनात विचार येतो, “मी कोण होते? विषानेही न मरणारी? भावेसारखी तळपणारी”[५] येथे कुंती स्वचा विचार करते. कुंती धात्रीला बाळाचा शोध लावायला लावते तिला कळते की बाळ अंगदेशातील चंपानगरीत सूत कुटुंबात वाढतो आहे.

कुंतीचे स्वयंवर हाते ती पांडुच्या गळ्यात वरमाला घलते तेव्हा तिला कवचकुंडल धारी बाळाची आठवण होते. कुंती यमाला आवाहन करते तिला त्याच्या अंशा पासून पुत्र होते त्याचे नाव युधिष्ठिर ठेवते. नंतर तिने वायूला आवाहन करून दुसरा पुत्र मिळविला त्याचे नाव भीम ठेवले आणि इंद्राला आवाहन करून तिसरा पुत्र मिळविला त्याचे नाव अर्जुन ठेवले पांडूच्या सांगण्यावरून अश्विनीकुमाराला आवाहन करण्याचा मंत्र माद्रिला दिला. तिला दोन पुत्र झाले त्याची नावे नकुल व सहदेव ठेवली. एक दिवस पांडूच्या मनात माद्रिबद्दल आसक्ती निर्माण होते किंदम ऋषीचा शाप खरा ठरला. पांडू मृत्यूमुखी पडला. महाभारतात पांडूच्या मृत्युनंतर पांडूच्या चितेला ऋषिमुनी अग्नी देतात पण या कादंबरीत धात्री नावाची सामान्य दासी पांडूच्या चितेला अग्नी देते, असा उल्लेख आहे. भारतीय संस्कृतीत प्रेताला पुरूष अग्नी देतात परंतु या कदंबरीत दिग्विजयी सम्राटाला एक सामान्य दासी अग्नी देते.

या कादंबरीत कुंतीनंतर गांधारीचा विवाह होतो. मूळ महाभारतात आधी गांधारी धृतराष्ट्र याचा विवाह आणि नंतर पांडू कुंती यांचा विवाह दाखविलेला आहे.

कर्ण दुर्योधनासाठी द्रौपदीस्वयंवराला जातो कारण दुर्योधनाला वाटते द्रौपदीशी विवाह करावा. कोणतीही स्त्री वृशालीपेक्षा सुंदर असू शकत नाही असे कर्णाचे मन म्हणते. तसेच स्वयंवरात कर्णाचा जयजयकार होतो तो कृष्णाच्या पायाकडे पाहतो पण जिंकू शकत नाही. दुर्योधनाला वाटते कर्णाने द्रौपदीला जिंकले तर ती अंगदेशाची महाराणी होईल आपण तिची मिरवणूक काढू. कर्ण जेव्हा लक्षभेद करायला जातो तेंव्हा द्रौपदी कर्णाला म्हणते, “आपण क्षत्रीय नाही मी कोणत्याही सारथ्याची पत्नी वा सून होण नाही मान्य करणार, मी एक क्षत्रियकन्या आहे शुद्र सारथीकन्या नाही”[६] ब्राम्हणरूपात आलेला अर्जुण पण जिंकतो. त्याच्या गळ्यात द्रौपदी वरमाला घालते त्यामुळे कर्णाचे व ब्राम्हणकुमाराचे युध्द होते इथे महाभारतापेक्षा वेगळेपण आले आहे. महाभरतात अर्जुनाचे राजांशी युध्द होते इथे कर्णाचे आणि ब्राम्हणकुमाराचे युध्दा होते. इथे महाभारतापेक्षा वेगळेपण आले आहे. या युध्दामध्ये कर्णाचा पुत्र सुदामन मृत्यूमुखी पडतो.

एक दिवस दुर्योधन काशिराजाची कन्या भानुमती हिला आणतो. त्यानंतर त्याचा विवाह होतो. दुर्योधनाची मिरवणूक निघते दुर्योधनाजवळ कर्ण बसलेला असतो. त्याच्याजवळ भानुमतीची बहिण सुप्रिया ही बसलेली

असते. भानुमती कर्णाला तिच्याशी विवाह करण्याची अट घालतो याकरिता दुर्योधन वृशालीच्या महालात जाऊन तिची परवानगी मागतो हाही एक काल्पनिक प्रसंग या कादंबरीत आला आहे.

वृशाली कुंतीला भेटायला जाते कुंती तिला आशीर्वाद देते. द्रौपदीला पुत्र होतात तेंव्हा ती वृशालीला निमंत्रण पाठविते कर्णाला आवडणार नाही म्हणून वृशाली जात नाही. कर्णाची पत्नी वृशाली पांचालीची सवत सुभ्रदा आणि वृशालीची सवत सुभद्रा असे नावातले साम्य दाखविले आहे. युधिष्ठिराचे नेहमी कर्णाच्या पायाकडे पाहणे, कुंतीचे व कर्णाच्या पायातील साम्य असे कितीतरी काल्पनिक प्रसंग या कादंबरीत आले आहे.

कर्णाला शकुनीमामा दृष्ट वाटतात. दुर्योधनाच्या कल्पना कर्णाला पटत नाही राजा म्हणवून घ्यायला दोन व्यक्ती श्रेष्ठ आहे एक कृष्ण आणि दुसरा दुर्योधन असे कर्णाला वाटते. कर्णाचा भाऊ शोण याचे निवेदन या कादंबरीत आले आहे. कृष्ण शिष्ठाई होते कृष्ण शकुनीमामा आणि कर्णाची कानउघाडनी करतात कर्णाला कृष्ण पांडवाकडे चल म्हणतात, तेंव्हा तो जात नाही कृष्ण आणि कर्णातील साम्य लेखकाने दाखविले आहे. कृष्ण आणि कर्णातील साम्य या कादंबरीतून दाखविले आहे. कृष्ण देवकीचा पुत्र होता पण तो नंदाघरी वाढला, कर्ण कुंतीचा पुत्र होता पण तो अधिरथाकडे वाढला. कृष्णही कर्णाचा जयतू राधेय कर्ण म्हणून उल्लेख करतात. या कादंबरीत दानवीर कर्णाचे वर्णन आले आहे.

**मृत्युंजय मधील कर्ण**

कर्ण हा या कादंबरीचा नायक आहे. कर्ण, कुंती, शोण, श्रीकृष्ण, दुर्योधन या व्यक्तिरेखांची निवेदन या कादंबरीत असली तरी या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा आहे कर्णाची.

कर्ण या कादंबरीचा नायक आहे तो स्वतःच्या जीवनाची भावकहाणी सांगतो. कर्ण हा कुंतीचा सूर्यापासून झालेला पुत्र कुंतीच्या विवाहा अगोदर कर्णाचा जन्म झाल्यामुळे कुंती कर्णाला अश्वनदीच्या पाण्यात सोडून देते. कर्णाला ज्या पेटीत ठेवलेले असते ती पेटी वाहत वाहत चंपानगरीत येते, ती पेटी एका सूताला सापडते त्या पेटीतील बालक घरी घेऊन जातात. त्या सारथ्याचे नाव अधिरथ आणि त्याच्या पत्नीचे नाव राधा असते. राधा आणि अधिरथ या छोट्या बालकाचा सांभाळ करतात त्याचे नाव कर्ण ठेवतात.

चंपानगरीत कर्णाचे बालपण जाते त्याला दोन भाऊ असतात एक शोण दुसरा वृकरथ. वृकरथ हा बालपणापासून मावशीकडे राहतो कर्ण आणि शोण बालपणी खूप खेळतात. बालपणी एकदा खेळ खेळत असताना सुध्दा कर्णाच्या मनात विचार येतात मलाच ही मांसल कुंडल का? इतरांना ती का नाहीत? एक दिवस कर्णाचा भाऊ शोण पडतो त्याला जखम होते त्याच्या डोक्याला लागते रक्त येते. तेव्हा कर्ण स्वतःच्या शरीरात बाण टोचतो पण त्याला लागत नाही तेंव्हाही त्याला वाटते मला का लागत नाही माझ्या अंगाल अभेद्य कवच का? अशाप्रकारे कर्ण बालपणापासून अभेद्य कुंडलाचा शोध घेतो.

मोठा झाल्यावर त्याचे बाबा त्याला हस्तिनापुरला नेतात तेव्हा गुरू द्रोणाचार्याकडे कर्णाला घेऊन जातात. द्रोणाचार्य तो क्षत्रिय नाही म्हणून विद्या देण्यास नकार देतात. त्याला कृपाचार्याच्या पथकात दाखल व्हायला सांगतात. तेंव्हाही कर्ण सूत आणि क्षत्रिय यांची तुलना करतो. सूत आणि क्षत्रिय ही दोन्ही माणसेच आहे असे त्याला वाटते. ही माणसे काही वेगळी नाही असे त्याला वाटते.

गुरू द्रोणाचार्य राजपुत्रासाठी स्पर्धा घेतात कर्णालाही पराक्रम करावासा वाटतो राज पुत्रांसासठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धांमध्ये सूतपुत्राला प्रवेश नाही हे कळल्यावर त्याला वाईट वाटते. कर्ण पराक्रमी असूनही त्याचा केवळ सूतपुत्र आहे म्हणून कृपाचार्य आणि द्रोणाचर्य अपमान करतात. एवढा पराक्रमी वीर आपल्या पक्षात यावा असे दुर्योधनाला वाटते म्हणून तो कर्णाला अंगदेशाचा राजा करतो आणि मित्रत्वाचा हात देतो. कर्णाचा सूतकन्या वृशाली सोबत विवाह होते तो पत्नीवर व मुलांवर प्रेम करतो.

दुर्योधनाच्या आग्रहावरून कर्ण हा दौपदी स्वयंवराला जातो तेथेही द्रौपदी त्याचा सूतपुत्र म्हणून अपमान करते म्हणून तो दुःखी होतो. एवढेच नव्हे तर ब्राम्हणाच्या वेशात असलेल्या अर्जुनाने द्रौपदीला जिंकल्यानंतर अर्जुन आणि कर्णाचे युध्द होते. त्या युध्दामध्ये कर्णाचा पुत्र सुदामन याचा मृत्यू होतो त्यामुळे कर्ण दुःखी होतो.

दुर्योधनाचा विवाह भानुप्रियासोबत होतो. भानुप्रियाची बहीन सुप्रिया हिच्या सोबत कर्णाचा विवाह होतो. कर्ण हा भानुप्रिया आणि वृशाली या दोन्ही पत्नीवर प्रेम करतो.

दुर्योधन आणि शकुनीमाता पांडवांचे धन आणि पत्नी दोन्ही द्युताच्या पाटावर जिंकण्याचा विचार करतात तेंव्हा कर्णाला शकुनीचा राग येतो. त्याच्या मनात विचार येतो, "मामा म्हणजे पराक्रमी क्षत्रिय आहेत की द्यूताच्या आड्यातील सराईत जुगारी."[७] आजपर्यंत बघितलेल्या सर्व माणसांमध्ये शकुनीमामा कुठेच बसत नव्हते असेही कर्णाचे मन म्हणते. कर्ण खूपदा दुर्योधनाला शकुनीमामाची साथ सोडायला सांगतो. कर्णाला दुर्योधना बद्दल आदर वाटतो पण दुर्योधनाच्या आणि शकुनी मामाच्या कपट कल्पना आवडत नाही द्यूत खेळल्या जाते ही गोष्ट कर्णाला द्यूत संपल्यावर कळते. त्याच्या मनात विचार येतो की, "कुरूची राजसभा आहे की कामुकांची, मदोन्मतांची, बुध्दी हरपलेल्या धुंदाची अत:पुरी आहे? छे या हस्तिनापुरात कशाला आलो मी चंपानगरीत एक सारथी म्हणून जगलो असतो तर काय बिघडल असते? कुठे चाललो आहे मी अंध:काराच्या, अध:पतनाच्या भयाण दरीकडे कुणी मला राजा केले दुर्योधनानं? हस्तिनापुरकरांनी की अज्ञाननियतीनं"[८] कर्णाला मुकूट काढून फेकून द्यावासा वाटतो कर्णाला वाटते द्रौपदीन आपल्याला अब्रू वाचव म्हणून विनंती केली असती तर तिला वाचवू पण ती कर्णाला अब्रू वाचविण्याची विनंती करीत नाही. कर्णाला द्रौपदीमध्ये वृशाली दिसू लागली सर्व लोकांचा त्याला राग येतो. आपण जर सूतपुत्र नसतो तर आपले जीवन कृष्णा सारखे झाले असते, असे विचार त्याच्या मनात येतात.

नंतर द्रौपदीने केलेला अपमान आठवतो तो म्हणतो, "पांचाली पतिव्रता नाही, ती वारांगना आहे, कुलटा आहे, कलंकिनी आहे"[९] हे शब्द बोलल्यानंतर त्याला खूप वाईट वाटते. पश्चातापाने तो दग्ध होतो पांडवाचा दुर्योधनाने अपमान करून त्यांना वनात पाठविले ही गोष्ट कर्णाला आवडत नाही.

कर्ण कुरूचा राजदंड घेऊन दिग्विजय करायला जातो. अनेक देश पादाक्रांत करून दिग्विजय करतो. तसेच कर्ण हा दानशूर असतो तो सूर्याची उपासना करतो. कोणताही याचक त्याच्याकडून परत जात नाही म्हणून त्याला लोक दानशूर कर्ण म्हणून ओळखतात. इंद्र त्याला कवच कुंडलाचे दान मागतो, कुंती त्याला पाच पांडव जिवंत राहण्याचे दान मागते, मृत्युसमयी एक ब्राम्हण त्याला दान मागतो तेंव्हा तो सोन्याचा दात काढून त्या ब्राम्हणाला देतो. अशाप्रकारे दानवीर कर्ण म्हणून त्याला सगळे ओळखतात.

कर्णाला तो सूर्य आणि कुंतीचा पुत्र आहे असे कळते तेव्हा खूप उशीर झालेला असतो पण हाच कर्ण ब्रम्हास्त्र मिळविण्यासाठी परशुरामाकडे जातो, तेंव्हा जात चोरून ब्रम्हास्त्र घ्यावे लागते. जेंव्हा परशुरामाला सत्य कळते तेंव्हा ब्रम्हास्त्र न आठविण्याचा शाप देतात. त्यामुळे ऐन युध्दाच्या वेळी ब्रम्हास्त्र आठवत नाही. एका ब्राम्हणाच्या गायीला बाण लागतो म्हणून त्याचा रथ जमिनित घुसण्याचा शाप मिळतो आणि कर्णाचा मृत्यू होते. सूतपुत्र म्हणून अव्हेरलेला कर्ण वीर मरण येऊन मृत्युंजय कादंबरीतून कर्णाची व्यक्तिरेखा साकार केली आहे. या कादंबरीतून "कर्णाच्या निमित्ताने शिवाजी सावंत नियतिचे गरगरणारे चक्र दाखवितात"[१०] असे वाटते. महाभारतातील कर्णाच्या व्यक्तिरेखेपेक्षा वेगळी कर्णाची व्यक्तिरेखा या कदंबरीत आली आहे. मराठीतील थोर साहित्यिक म्हणून शिवाजी सावंत यांचे नाव अजरामर आहे. शिवाजी सावंत "मराठीतर नव्हे तर भारतीय साहित्य रसिकांच्याही ह्दयात घर करून वसले आहे. 'मृत्युंजय' या आपल्या पहिल्याच कादंबरीने त्यांनी अक्षरश: इतिहास घडविला आहे"[११] मूळे महाभारतात कर्ण हा खलनायक म्हणून ओळखला जातो परंतु शिवाजी सावंत यांनी कर्णाला दानशूर कर्ण म्हणून उजाळा दिला आहे.

**समारोप**

शिवाजी सावंतांच्या मृत्युंजय कादंबरीमधील कर्ण स्व चा शोध घेतो. तसेच या कादंबरीत कर्ण, कुंती, वृशाली, दुर्योधन, शोण, कृष्ण यांची निवेदन आली आहेत. आपल्यालाच फक्त कवचकुंडल आहेत इतरांना नाही असे त्याला वाटते त्याचाही तो शोध घेतो. तसेच कर्ण सूर्याची उपासना करतो, गुरू द्रोणाचार्य आणि कृपाचार्य कर्णाचा अपमान करतात तेंव्हा दुर्योधन कर्णाला अंगदेशाचा राजा करतो. एक पराक्रमी मित्राला वीर बनवितो. सूत आणि क्षत्रिय ही माणसेच आहे असे त्याचे मन म्हणते. युधिष्ठिराचे नेहमी कर्णाच्या पायाकडे पाहणे कुंती आणि

**© Association of Academic Researchers and Faculties (AARF)**
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

कर्णाच्या पायातील साम्य असणे असे कितीतरी प्रसंग या कदंबरीत आले आहे. शिवाजी सावंत यांनी या कादंबरीत दिग्विजयी कर्ण तसेच दानशून कर्ण दाखवून कादंबरीला यशाच्या शिखरावर बसवले आहे. अशा प्रकारे मृत्युंजय कादंबरीने यशाचे शिखर गाठले आहे.

**निष्कर्ष**

१. मृत्युंजय कादंकरीमध्ये दानशूर कर्णाचे वर्णन केले आहे.

२. मृत्युंजय ही कादंबरी शिवाजी सावंत यांच्या लेखन कर्तृत्वाचे शिखर आहे.

३. कवच कुंडले मलाच का आहे? असे त्याला नेहमी वाटते स्व चा शोध घेणारा कर्ण या कादंबरीत आलेला आहे.

४. या कादंबरीत कर्ण, कुंती, वृशाली, दुर्योधन, शोण, कृ ण यांची निवेदन आली आहे.

५. महाभारतातील कर्णाच्या व्यक्तिरेखेपेक्षा वेगळी कर्णाची व्यक्तिरेखा ‘मृत्युंजय’ कादंबरीत आली आहे.

**संदर्भ टिपा**


१. शिवाजी सावंत – ‘मृत्युंजय’ कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९६७, पुनर्मुद्रण २००३ पृ.क्र. १२

२. तत्रैव – पृ.क्र. १२

३. तत्रैव – पृ.क्र. १८

४. तत्रैव – पृ.क्र. १८

५. तत्रैव – पृ.क्र. १११

६. तत्रैव – पृ.क्र. २२३

७. तत्रैव – पृ.क्र. २२९

८. तत्रैव – पृ.क्र. ३३१

९. तत्रैव – पृ.क्र. ३२८

१०. संपा. अनिरूध्द अनंत कुळकर्णी– ‘प्रदक्षिणा खंड–२, १९४७ ते २०००’ कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९१, पुनर्मुद्रण २००० पृ.क्र. २००

११. रश्मी वाटाणे – ‘युगसाक्षी साहित्यिक शिवाजी सावंत’ राघव पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्युटर, नागपूर २०१८ पृ.क्र. १



**© Association of Academic Researchers and Faculties (AARF)**

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. संपा. कुळकर्णी अनिरूध्द अनंत – 'प्रदक्षिणा खंड–२, १९४७ ते २०००' कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९१, पुनर्मुद्रण २०००
२. कुळकर्णी श्री. मा. – कादंबरीची रचना, उन्मेश प्रकाशन, नागपूर १९५६
३. कुरूदकर नरहर – धार आणि काढ, राज देशमुख अॅन्ड कम्पनी, पुणे, १९७१
४. बांदिवडेकर चंद्रकान्त – मराठी कादंबरीचा इतिहास १९२० ते १९४७, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, व्दितीय आवृत्ती, १९९६
५. वाटाणे रश्मी – 'युगसाक्षी साहित्यिक शिवाजी सावंत' राघव पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रिब्युटर, नागपूर २०१८
६. सावंत शिवाजी – 'मृत्युंजय' कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९६७, पुनर्मुद्रण २००३